# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## प्रसिध्दीपत्रक

**शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ३० श.प्र.मि. जाने./फेब्रु. - २०१७ व ४० श.प्र.मि. डिसेंबर २०१६ निकाल.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत जाने./फेब्रु.- २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या संगणक टायपिंग प्रमाणपत्र ३० श.प्र.मि. परीक्षेचा निकाल शुक्रवार दिनांक ०७/०४/२०१६ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला आहे. इंग्रजी ३० श.प्र.मि या विषयाची परीक्षा २७/०१/२०१७ ते ३१/०१/२०१७ व मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि. या विषयाची परीक्षा ०२/०२/२०१७ व ०५/०२/२०१७ राज्यातील एकूण १९७ केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. त्यापैकी ३० श.प्र.मि.परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच डिसेंबर - २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या ४० श.प्र.मि. परीक्षेचा निकालही घोषीत करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल. जाने./फेब्रु. २०१७ मधील ४० श.प्र.मि. परीक्षेचा निकाल लवकरच घोषित करण्यात येईल.

- विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे / गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सर्व व मुंबईसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थीने संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/-ऑनलाईन पध्दतीने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. ०५००१०२१०००००३५ वर संस्था login व्दारे दिनांक १६/०४/२०१७ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती ( ३० श.प्र.मि. जाने./ फेब्रु. २०१७)**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ३०श.प्र.मि<br>हिंदी ३० श.प्र.मि | १९६४० | १७५९६ | २०४४ | ४९२१ | १२६०७ | ६८ | २८.२९ % |
| इंग्रजी ३० श.प्र.मि | ३६२९६ | ३३४०५ | २८९१ | १३४४४ | १९९१७ | ४४ | ४०.२९ % |
| एकूण | ५५९३६ | ५१००१ | ४९३५ | १८३६५ | ३२५२४ | ११२ | ३६ % |

E/computer typ.Abh./Main folder/ Result Declare result

# निकालाची संक्षिप्त माहिती ( ४० श.प्र.मि. डिसेंबर २०१६)

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ४०श.प्र.मि<br>हिंदी ४० श.प्र.मि | १०७ | १५ | ९२ | ४ | ११ | ० | २६.६६ % |
| इंग्रजी ४० श.प्र.मि | २६४ | ४२ | २२२ | १३ | २९ | ० | ३०.०९ % |
| एकूण | ३७१ | ५७ | ३१४ | १७ | ४० | ० | २९.८२ % |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१

E/computer typ.Abh./Main folder/ Result Declare result